**विभागीय परीक्षा--**
**वरीष्ठ पदावर पदोन्नतीसाठी मागसवर्गीय उमेदवारांना सवलत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय,क्र.परीक्षा-१२०६/प्र.क्र.७/०६/१७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ नोव्हेंबर, २००६

वाचा :- शासन निर्णय, समान्य प्रशासन विभाग, क्र : ईएक्सएम-१०७५/१६८१/१७, दिनांक : २४ ऑगस्ट, १९७६.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी लोकसेवांमधील व पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरिता आणि तत्संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरीता सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८ विहित केला आहे. त्यानुसार विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना देखील पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित केलेले आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमातींना देखील पदोन्नतीमध्ये आरक्षण यापूर्वीच विहित केलेले आहे. या प्रवर्गातील उमेदवारांना पदोन्नतीसाठीच्या परीक्षेमध्ये एक अतिरीक्त संधी व एक जादा वर्ष देण्यात येते त्याच धर्तीवर <u>"विशेष मागास प्रवर्गातील"</u> उमेदवारांना देखील पदोन्नतीकरिता विहित केलेल्या विभागीय परीक्षांमध्ये एक अतिरिक्त संधी व एक अतिरिक्त वर्ष देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

## शासन निर्णय

विविध विभागातील /कार्यालयातील वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यासाठी ज्या विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक ठरविले आहे, त्या विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जमातीच्या उमेदवारांना, सर्वसाधारण (खुल्या) उमेदवारांपेक्षा एक अतिरिक्त संधी व एका जादा वर्ष देण्याची तरतूद शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.ईएक्सएम-१०७५/१६८१/१७, दि.२४ ऑगस्ट, १९७६ च्या आदेशान्वये केलेली आहे. सदर सवलत आता "विशेष मागास प्रवर्गातील" उमेदवारांनाही लागू करण्यात येत आहे.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अखत्यारीतील विविध पदांवर पदोन्नतीसाठी अनिवार्य म्हणून विहित केलेल्या विभागीय परीक्षा नियमामध्ये <u>"विशेष मागास प्रवर्गातील"</u> उमेदवारांना देखील एक अतिरिक्त संधी व एक अतिरिक्त वर्षाचा कालावधी परीक्षा उत्तीर्ण होण्याबाबत अनुज्ञेय करण्याबाबत आवश्यक त्या सुधारणा करण्यात

(कृ. मा. पृ.

याव्यात. उचित कार्य पध्दतीचा अवलंब करुन अशा सुधारणा नियमात होईपर्यंत या आदेशातील तरतुदीनुसार "विशेष मागास प्रवर्गातील" उमेदवारांना पदोन्नतीसाठी विहित विभागीय पदोन्नती परीक्षामध्ये एक जादा संधी व एक अतिरिक्त वर्ष देण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र.कृ.लोखंडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
वित्त विभाग, सेवा-५,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
* सचिव, अनुसूचित जमाती कल्याण समिती,विधान भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,
*पत्राने.